# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि /1230/२०१९ दिनांक: 9 /07/२०१९

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :— उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शैक्षणिक संस्थामधील रिक्त पदांची माहीती पोर्टलवर भरण्यासंदर्भात

संदर्भ :— क्र. संकिर्ण/२०१९/प्र.क्र. २४९/मशि—उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे दिनांक १८ जुन २०१९ च्या पत्रानुसार प्राप्त दिनांक २४/०६/२०१९

महोदय

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडुन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शैक्षणिक संस्थामधील रिक्त पदांची माहीती पोर्टलवर भरण्यासंदर्भात दिनांक १८ जुन २०१९ ला शासनाकडुन पत्र निर्गमित करण्यात आलेले असुन सदर पत्र सोबत संलग्नित करण्यात येत आहे. ज्या महाविद्यालयाने संलग्नित केलेल्या पत्रानुसार आजतागायत कार्यवाही घेतलेली नाही अशा महाविद्यालयाने url:-https;//nherc.in या पोर्टलवर शिक्षकीय रीक्त पदांची माहीती भरण्याची कार्यवाही तातडीने घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

मा. प्र. कुलगुरु यांच्या आदेशान्वये

(डॉ. व्ही.सी. सिलारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :— उपरोक्तप्रमाणे

४०२५ २४/६/१९

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.२४९/मशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादामकामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक १८ जून, २०१९

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय:- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शैक्षणिक संस्थांमधील रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरण्यासंदर्भात

महोदय,

केंद्र शासनाच्या दिनांक ६.६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक संस्थांमध्ये रिक्त पदभरतीचा समयबद्ध कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.६.२०१९ रोजी याबाबत मार्गदर्शक सूचनांही निर्गमित केलेल्या आहेत. या समयबद्ध कार्यक्रमाचा भाग म्हणून शैक्षणिक संस्थांमधील {खाजगी व सार्वजनिक विद्यापीठे, सलंग्नित महाविद्यालये (शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी)} संपूर्ण रिक्त पदांची माहिती पोर्टलवर url:- https;//nherc.in वर दिनांक २५ जून, २०१९ पूर्वी भरण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिलेले आहेत. या विषयासंदर्भात सचिव, (उच्च शिक्षण) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय हे दिनांक २५.०६.२०१९ रोजी व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा घेणार असल्याने तत्पूर्वी या प्रकरणी कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी याबाबत पुढील सूचना विचारात घेऊन रिक्त पदांची माहिती url:- https;//nherc.in या पोर्टलवर भरण्यासंदर्भातील कार्यक्रम आखून याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. याबाबतचा दैनिक अहवाल विभागास पाठविण्यात यावा.

१) **खाजगी संस्था:-** सर्व खाजगी/अभिमत विद्यापीठे व खाजगी महाविद्यालये/ शैक्षणिक संस्थांना नमूद पोर्टलवर विहित मुदतीत माहिती भरण्याबाबत कळविण्यात यावे.

२) **अनुदानित संस्था:-** दिनांक १.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित पदांची अनुज्ञेयता संबंधित सहसंचालक कार्यालयाने महाविद्यालयांना कळविली असल्याने व त्या आधारे पदभरतीची मोहीम सध्या राबविण्यात येत असल्याने या माहितीच्या आधारे रिक्त पदांची माहिती संबंधित पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संस्थांनी परस्पर माहिती भरल्यास त्यामध्ये तफावत होईल, यास्तव या पोर्टलवर महाविद्यालयांनी परस्पर माहिती न भरता सदरहू माहिती भरण्याकरिता संबंधित सहसंचालकांनी त्यांच्या अधिनस्त अनुदानित महाविद्यालयांच्या कार्यशाळा आयोजित करुन, भरण्यात येणारी

माहिती सहसंचालकांनी प्रमाणित करुन कार्यशाळेमध्ये सदर माहिती महाविद्यालयांकडून भरली जाईल, याची खात्री करावी.

३) **शासकीय महाविद्यालये:**- या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही शासकीय महाविद्यालयांनी करावी.

४) **विद्यापीठे:**- या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही अकृषी विद्यापीठांनी करावी.

आपली

(रोहिणी भालेकर)
उप सचिव (मशि)